# प्रकरण ५.
# संघराज्य, त्याचे राज्यक्षेत्र

| कलम | तरतुदी |
|---|---|
| | **भाग पहिला : संघराज्य व त्याचे क्षेत्र** |
| १ | संघराज्याचे नाव व राज्यक्षेत्र |
| २ | नवीन राज्य समाविष्ट किंवा स्थापन करणे |
| २ अ | निरसित |
| ३ | नवीन राज्यांची निर्मिती व विद्यमान राज्यांची क्षेत्रे, सीमा / नावे यात फेरबदल |
| ४ | कलम २ व ३ खालील कायद्यांद्वारे पहिल्या व चौथ्या परिशिष्टाच्या दुरुस्तीकरिता वा पुरक, आनुषांगिक व परिणामी बाबींकरिता उपलब्ध करणे. |

- भारताच्या राज्यघटनेतील भाग I मधील कलम १ ते ४ हे संघराज्य व त्याच्या राज्यक्षेत्राशी संबंधित आहेत.
- कलम १(१) नुसार, इंडिया, अर्थात भारत हा राज्यांचा संघ असेल. मात्र, भारत कोणत्या राज्यांचा संघ असेल हे या कलमात देण्यात आलेले नाही. कलम १(२) नुसार, घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांची नावे आणि त्यांचे राज्यक्षेत्र (भूप्रादेशिक विस्तार) पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.
- कलम १(३) नुसार, भारताचे राज्यक्षेत्र पुढील बाबींचे मिळून बनलेले असेल.

**भारताचे राज्यक्षेत्र**

**I] घटकराज्यांची, राज्यक्षेत्रे** **II] केंद्रशासित प्रदेश** **II] संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्र**

- भारताच्या घटनेमध्ये संघराज्यीय व्यवस्थेची अनेक वैशिष्टये असतांनाही भारताचे वर्णन 'संघराज्य' असे न करता 'राज्यांचा संघ' असे करण्यात आले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मते, 'संघराज्य' या शब्दप्रयोगाऐवजी 'राज्यांचा संघ' या शब्दांचा वापर करण्यामागे दोन कारणे आहेत.
  १) भारताचे संघराज्य अमेरिकन संघराज्याप्रमाणे घटकराज्यांतील कराराद्वारे निर्माण झालेली नाही.
  २) घटकराज्यांना संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार नाही.

## ➢कलम २ : नवीन राज्ये दाखल करुन घेणे किंवा स्थापन करणे.

कलम २ अन्वये, संसदेला दोन अधिकार देण्यात आले आहेत.
१)योग्य अटी व शर्तींवर कायद्याद्वारे नवीन राज्ये संघराज्यात दाखल करुन घेण्याचा अधिकार आणि (असा अधिकार संबंधित राज्यविधीमंडळाला नाही.)
२)नवीन राज्ये स्थापन करण्याचा अधिकार

## ❖कलम ३ : नवीन राज्यांची निर्मिती

कलम ३ नुसार मुळ अस्थित्वात असलेल्या राज्यामधून त्यांचे १) नाव बदलणे २) सीमा बदलणे ३) क्षेत्रफळ बदलणे (कमी जास्त करणे.) किंवा तो पुढीलप्रमाणे:

१) एखाद्या राज्यातून काही क्षेत्र अलग करणे.
२) २ किंवा काही राज्याचा भाग एकत्र जोडून
३) कोणत्याही राज्याचे क्षेत्र दुसऱ्या राज्याशी जोडून
४) केंद्र शासित प्रदेश किंवा संपादित प्रवेश

## ❖संसदेला कायद्याद्वारे :

१) कोणत्याही राज्यापासून एखादे राज्यक्षेत्र अलग करुन अथवा दोन किंवा अधिक राज्ये किंवा राज्यांचे भाग एकत्र जोडून अथवा कोणतेही राज्यक्षेत्र कोणत्याही राज्याच्या एखाद्या भागाशी जोडून नवीन राज्याची निर्मिती करता येईल.
२) कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढवता येईल.
३) कोणत्याही राज्याचे क्षेत्र घटवता येईल.
४) कोणत्याही राज्याच्या सीमांमध्ये फेरफार करता येईल.
५) कोणत्याही राज्याच्या नावामध्ये फेरफार करता येईल.

- मात्र, असे करतांना या कलमात पुढील दोन अटी टाकण्यात आल्या आहेत.

१. या प्रयोजनार्थ असलेले विधेयक राष्ट्रपतीची शिफारस असल्याखेरीज संसदेत मांडता येणार नाही, आणि
२. अशी शिफारस करण्यापूर्वी राष्ट्रपतींना ते विधेयक संबंधित राज्याच्या विधिमंडळाकडे त्याला आपले विचार व्यक्त करण्यासाठी पाठवावे लागेल त्यासाठी राष्ट्रपती ठराविक कालावधी विनिर्दिष्ट करु शकतात. तसेच आवश्यकतेप्रमाणे तो कालावधी वाढवून देऊ शकतात.

## ❖कलम ३ साठी महत्त्वाच्या घटनादुरुस्ती :

### ❑ ५ वी घटनादुरुस्ती (२४ डिसेंबर १९५५) :-

- "राज्यघटना (५ वी दुरुस्ती) अधिनियम, १९५५ यानुसार घटनेतील कलम ३ मध्ये अशी दुरुस्ती करण्यात आली की, राष्ट्रपतींच्या शिफारशीशिवाय संसदेच्या कोणत्याही सभागृहामध्ये असे कोणतेही विधेयक सादर करता येणार नाही, ज्या विधेयकाच्या प्रस्तावाद्वारे पहिल्या अनुसूचीतील भाग 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही राज्याच्या भूप्रदेशावर, सीमारेषेवर किंवा नावावर परिणाम (Affects) होईल, संदर्भामध्ये नमूद केलेल्या कालावधीत आपले मत व्यक्त करण्यासाठी राज्याच्या विधिमंडळाकडे राष्ट्रपतीने विधेयक पाठविलेले असेल किंवा राष्ट्रपतीने पुढे अनुमती दिलेल्या कालावधीमध्ये आणि असा नमूद वा संमत केलेल्या कालावधीची मुदत संपली असेल."
- स्पष्टीकरण १ – पहिल्या अनुसूचीतील भाग 'अ' मध्ये घटकराज्यांची नावे आणि त्यांचे भूक्षेत्र नमूद आहे. तर भाग 'ब' मध्ये केंद्रशासित प्रदेशांची नावे व त्यांच्या भूक्षेत्राचा उल्लेख आहे.
- स्पष्टीकरण २ - उपरोक्त घटनादुरुस्तीतील – 'पहिल्या अनुसूचीतील भाग 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद केलेल्या' – हे राज्यघटना ७ वी दुरुस्ती अधिनियम, १९५६ अन्वये वगळण्यात आले आहे.
- १९५६ सालच्या ७ व्या घटनादुरुस्तीपूर्वी 'घटकराज्ये' याचा आविष्कार म्हणजे भाग 'अ' घटकराज्ये, भाग 'ब' घटकराज्ये आणि भाग 'क' घटकराज्ये असाच होता. या घटनादुरुस्तीने राज्यघटनेमध्ये 'केंद्रशासित प्रदेश' या संकल्पनेचा समावेश करण्यात आला. तथापि, कलम ३ मध्ये 'केंद्रशासित प्रदेश' या संज्ञेचा अंतर्भाव करण्यासाठी दुरुस्ती करण्यात आली नाही.

### ❑ १८ वी घटनादुरुस्ती (२७ ऑगस्ट १९६६) :-

- राज्यघटना (१८ वी दुरुस्ती) अधिनियम, १९६६ अन्वये राज्यघटनेतील कलम ३ च्या शेवटी पुढील स्पष्टीकरणाचा अंतर्भाव करण्यात आला –
- (स्पष्टीकरण १ - कलम ३ मधील खंड 'अ' ते 'इ' मध्ये 'घटकराज्य' (State) यात 'केंद्रशासित प्रदेशाचा (Union Territory) समावेश होतो, परंतु या अटीवर (But in the Provison) 'घटकराज्य' यामध्ये केंद्रशासित प्रदेशाचा समावेश होत नाही.
- स्पष्टीकरण २ - कलम ३ मधील खंड 'अ' नुसार संसदेला असलेल्या अधिकारामध्ये कोणत्याही राज्याचा वा केंद्रशासित प्रदेशाचा भूप्रदेश इतर कोणत्याही घटकराज्य वा केंद्रशासित प्रदेशाशी जोडून नवीन घटकराज्य वा केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.)

## ❖कलम ४ –

- कलम ४ मध्ये असे घोषित करण्यात आले आहे की, नवीन राज्ये दाखल करुन घेणे किंवा स्थापन करण्यासाठी (कलम २ अन्वये), तसेच नवीन राज्यांची निर्मिती आणि त्यांची क्षेत्रे, सीमा अथवा नावे यांत फेरफार करण्यासाठी (कलम ३ अन्वये) करण्यात आलेला कायदा.
- नविन राज्य निर्माण करण्याची संबंधित घटनादुरुस्ती ही कलम ३६८ च्या प्रयोजनार्थ घटनादुरुस्ती असल्याचे मानले जाणार नाही. (म्हणजेच ही घटनादुरुस्ती कलम ३६८ च्या बाहेरील असेल.)

↓
संबंधित कलमेतील
↓
Simple amendment Method

३६८ (Complex Amendment Method)

## ❖ भारतीय संघराज्याची वैशिष्टये :-

- भारताच्या राज्यघटनेमध्ये भारताचे वर्णन ‘संघराज्य’ असे केलेले नाही, तर ‘राज्यांचा संघ’ असे केलेले आहे. घटनेच्या पहिल्या कलमात ‘इंडिया अर्थात भारत हा राज्यांचा संघ असेल’ असे म्हटलेले आहे. अर्थात, भारत हे संघराज्यच आहे. संघराज्य निर्मितीसाठी जी किमान वैशिष्टये आवश्यक असतात ती भारतीय व्यवस्थेत दिसून येतात. पण त्याचबरोबर भारतीय संघराज्याची अशी काही किमान वैशिष्टये आवश्यक असतात ती भारतीय व्यवस्थेत दिसून येतात. पण त्याचबरोबर भारतीय संघराज्याची अशी काही खास वैशिष्टयेही दिसून येतात, ती पुढीलप्रमाणे:

**भारतीय संघराज्याचे स्वरुप :**

| १) एकात्म शासन पद्धती | २) संघराज्य शासन पद्धती |
|---|---|
| • सर्व सत्ता राष्ट्रीय सकारच्या हातामध्ये एकवटलेली असते.<br>• प्रादेशिक सरकार हे राष्ट्रीय सरकारकडून अधिकारप्राप्त असतात.<br>• **उदा.** – ब्रिटन, फ्रान्स, जपान, चीन, इटली, बेल्जीयम, नार्वे, इटली, स्विडन, स्पेन | • राज्यघटना अधिकार विभाजन करते.<br>• दोन्ही (केंद्र व राज्य) आपले कार्य स्वतंत्र पणे पार पाडतात.<br>• **उदा.** – U.S.A. स्वित्झर्लंड, Aus, कॅनडा, रशिया, ब्राझील इ. |

**संघराज्य म्हणजे काय ?**

- संघराज (Federation) हा शब्द foedus ह्या लॅटीन शब्दावरुन घेतला आहे. Fodus म्हणजे करार होय. याचाच अर्थ असा कि – नवीन राजकीय व्यवस्था ज्यासाठी एकमेकांसोबत करार केले जातात.
- **उदा.** – रशिया, (५० घटकराज्ये) U.S.A., U.A.E. कॅनडा (१० घटकराज्ये)
  - U.S.A. हे ब्रिटीश ताब्यातील १३ वसाहती व मुळ ३७ वसाहती अश्म ५० वसाहतीचे बनले आहे.

**भारतातील राजव्यवस्था :**

- घटनेत कोठेही संघराज्य या शब्दाचा उल्लेख नाही.
- डॉ. आंबेडकरांच्या मते कलम १ नुसार भारतात हा राज्याचा संघ आहे. कारण
  १) सर्व राज्य करार करुन आलेली नाहीत.
  २) कोणतेही घटकराज्य फुटुन बाहेर पडू शकत नाही.
- भारताचे संघराज्य स्वरुप कॅनडाच्या संघराज्याशी मिळते जुळते आहे. कारण कॅनडाच्या राज्यघटनेत पण तेथील राज्यांस राज्यांचा संघ म्हटले आहे, त्याचबरोबर तेथील सरकार हे विधानाद्वारे निर्माण झाले आहे. केंद्रास जादा अधिकार

**भारतीय संघराज्याची वैशिष्टये :**

- प्रो. डायसी - “संघराज्य एक अशी राजकीय व्यवस्था आहे का ज्यामध्ये राष्ट्रीय एकता आणि सत्ता तसेच प्रदेशांच्या अधिकारांचे रक्षण करताना दोन्हीमध्ये सामंजस्य प्रस्थापित केले जाते.”
- फायनर - “असे शासन आहे की ज्यामध्ये सत्ता आणि अधिकार यांचा एक भाग स्थानिक क्षेत्रात समाविष्ट होतो व दुसरा भाग केंद्र शासनामध्ये.”
- प्रो. के. सी. व्हिअर - भारतीय शासनव्यवस्थेस अधिकाधिक ‘अर्धसंघीय’ म्हणता येते.
- दुर्गादास बस - ‘भारतीय संविधान हे संघात्मक आणि एकात्मक अशा दोहोंचे मिश्रण आहे.’
- प्रो. के. संथानम, प्रो. अलेक्झांड्रोविच - भारत हे पूर्णत: संघात्मक शासन आहे.
- अशोक चंद्र - ‘federalism in India’ यामध्ये असे मत मांडले की, अनेक विद्वानांनी भारतीय संविधानास अर्धसंघात्मक संबोधले असले तरी त्याचे तात्पर्य समजून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही की हे संविधान हे संघीय असू शकते अथवा एकात्मक.
- थोडक्यात, भारतीय संघराज्याचे स्वरुप वरील विविध वैशिष्टयांवरुन समजून येते.

मूळ घटनेतील १ ल्या अनुसुचितील

(२९ राज्ये) = हे पूर्वीचे ब्रिटिश प्रांत + संस्थाने

११ पैकी २ प्रांत Pak

↓

२९ राज्ये = (९ प्रांत + ५५२ संस्थाने)

↓

(अंतरिम सरकारचे प्रांत)

## ❖ २९ राज्ये

१) भाग अ राज्ये (९) - पूर्वीचे ब्रिटिश प्रांत (गव्हर्नसंची राज्ये)
२) भाग ब राज्ये (९) - पूर्वीचे संस्थाने (राज्यप्रमुखांची राज्ये)
३) भाग क राज्ये (१०) - केंद्रशासित क्षेत्र (कमिशनर्सची राज्ये)
४) भाग ड राज्ये (१) - (अंमदमान व निकोबार बेटे)

# विविध राज्यपुनर्रचना आयोग

## ❖एस.के. दार आयोग (१९४८) :

- भारतीय संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी राज्य पुनर्रचनेबाबत शिफारस करण्यासाठी एस.के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग स्थापन केला.
- **अध्यक्ष :** एस. के. दार, **निवृत्त न्यायाधीश :** अलाहाबाद उच्च न्यायालय
- **सदस्य :** १. जे.एन. लाल व प्रसिध्द वकील २. पन्नालाल निवृत्त आय.ए.एस. अधिकारी
- एकूण ५६ पानी अहवाल
- आयोगाने अशी शिफारस केली की, भाषावर प्रांतरचना करण्याची सध्या गरज नाही. ही बाब बेमुदत काळासाठी पुढे ढकलावी.
- या आयोगाने अशी शिफारस केली की, राज्य पुनर्रचनेसाठी प्रशासकीय सोय हा प्रमुख निकष असावा, भाषा किंवा संस्कृती नव्हे.
- मात्र या आयोगाने आंध्रप्रदेशाची निर्मिती भाषिक आधारावर करण्यास अनुकूलता दर्शविली. त्यामुळेच या आयोगाने तेलगुभाषिक जनतेला आंध्रप्रदेशाच्या मागणीसाठी एक नवीन संधी उपलब्ध करुन दिली.

## ❖जे.व्ही.पी. समिती (डिसेंबर १९४८):

- **सदस्य:** जवाहरलाल नेहरु ,(J) वल्लभभाई पटेल (V)व पट्टाभी सितारमया (P)
- या आयोगाला कोणीही अध्यक्ष नव्हते.

- दार आयोगाच्या अहवालानुसार असंतुष्ट असलेल्या काँग्रेस पक्षाने आपली एक स्वतंत्र समिती स्थापन केली, ज्यामध्ये जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारमया यांचा समावेश होता मात्र या समितीनेही भाषिक आधारास अनुकूलता दर्शविली नाही.
- त्यामुळे तेलगुभाषिक प्रदेशामध्ये मोठा असंतोष निर्माण झाला, ज्यादरम्यान पोट्टी श्रीरामलू या आंध्र देशभक्ताचा ५२ दिवसांच्या उपोषणानंतर मृत्यू झाला. त्यामुळे १९५३ मध्ये सरकारने तात्काळ आंध्रप्रदेशाच्या निर्मितीची घोषणा केली, तसेच राज्य पुनर्रचना आयोग स्थापन करण्याचे वचन दिले.
- राज्यांची निर्मिती करताना देशाची सुरक्षा, एकता व आर्थिक समृध्दीकडे लक्ष ठेवणे.

## • फाजलअली राज्य पुनर्रचना आयोग PAK आयोग (१९५३) :

- अध्यक्ष : फाजलअली निवृत्त न्यायाधीश : सर्वोच्च न्यायालय
- सदस्य : १. हृदयनाथ कुंझरु (राज्यसभा सदस्य) २. के.एम. पण्णीकर (राज्यसभा सदस्य)
- या आयोगास पाक आयोग असेही म्हणतात.
- या आयोगाने सप्टेंबर १९५५ मध्ये अहवाल सादर केला. आयोगाने भाषिक आधारावर राज्यांची पूनर्रचना करण्याच्या तत्त्वास अनुकूलता दर्शविली. मात्र एक राज्य - एक भाषा या तत्त्वाचा अस्विकार केला आयोगाच्या मते देशाच्या राजकीय घटकांची कोणतीही पुनर्रचना करताना भारताच्या एकतेला प्राथमिक महत्त्व दिले गेले पाहिजे.
  आयोगाने राज्य पुनर्रचनेच्या योजनेसाठी चार प्रमुख घटकांची ओळख केली.
  १) देशाची एकता व सुरक्षा टिकविणे व बळकट करणे.
  २) भाषिक व सांस्कृतिक एकसंघपणा
  ३) वित्तीय आर्थिक व प्रशासकीय मुद्दे
  ४) प्रत्येक राज्यातील त्याचबरोबर संपूर्ण देशातील जनतेच्या कल्याणाचे नियोजन व प्रवर्तन
- या आधारावर आयोगाने मूळ घटनेतील राज्यांचे चार - गटांतील विभाजन रद्द करुन त्याजागी १६ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याची शिफारस केली.
- भारत सरकारने अहवाल स्विकारला त्या आधारावर १९५५ साली राज्यपुर्नररचना कायद्या मंजुर केला.
- १ नोव्हेंबर १९५६ पासून अम्लबजावणी सुरु झाली. व १४ घटकराज्य व ६ केंद्रशासित प्रदेश तयार करण्यात आली. ही घटनादुरुस्ती कलम ४ बाहेरील घटनादुरुस्ती आहे.

## ❖१९५६ नंतर निर्माण करण्यात आलेली नवीन घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेश :-

- १९५६ साली मोठया प्रमाणात राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतरही भारताच्या राजकीय नकाशात त्यानंतर जन आंदोलने आणि राजकीय परिस्थितीमुळे सातत्याने बदल होत राहिले.

### क) महाराष्ट्र आणि गुजरात :

- १९६० साली 'बॉम्बे' या द्वैभाषिक राज्याचे विभाजन होऊन मराठी भाषिकांचे महाराष्ट्र आणि गुजराती भाषिकांचे गुजरात ही राज्ये स्वतंत्र करण्यात आली. गुजरात हे भारतीय संघातील १५ वे राज्य बनले.

### ख) दादरा आणि नगर हवेली :

- १९५४ साली तिच्या मुक्तीपर्यंत या प्रदेशावर पोर्तुगीजांचे राज्य होते. त्यानंतर, तेथील लोकांनी नियुक्त केलेल्या एका प्रशासकामार्फत १९६१ पर्यंत या भागाचे प्रशासन चालवण्यात आले. १९६१ साली १० वी घटनादुरुस्ती करुन या भूप्रदेशाला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला.

### ग) गोवा, दमण आणि दीव :

- १९६१ साली पोलीस कारवाई करुन भारताने हा भूप्रदेश (तीनही भाग) पोर्तुगीजांकडून प्राप्त केले. १९६२ साली १२ व्या घटनादुरुस्तीने त्यास केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला आहे. पुढे, १९८७ मध्ये गोव्याला घटक राज्याचा दर्जा देण्यात आल्याने दमण व दीव हे स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश बनले.

### घ) पाँडिचेरी :

- या प्रदेशावर फ्रेंचांची सत्ता होती. पाँडिचेरी, कराईकल, माहे (Mahe) यनम (Yanam) या क्षेत्रांवर फ्रेंच वसाहती होत्या. १९५४ साली फ्रेंचांनी हा प्रदेश भारताकडे हस्तांतरित केला. परिणामी, १९६२ साली १४ व्या घटनादुरुस्तीद्वारे तिला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देईपर्यंत तिचे प्रशासन 'प्राप्त भूप्रदेश' याप्रकारे चालविले गेले.

### च) नागालँड :

- आसाम राज्यातील नागा टेकडया आणि तुएनसंग (Tuensang) या प्रदेशाला विभक्त करुन १९६३ साली स्वतंत्र नागालँड राज्य निर्माण केले. भारतीय संघातील १६ वे राज्य म्हणून मान्यता देण्यापूर्वी नागालँडला १९६१ साली आसामच्या राज्यपालांच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होते.

### छ) हरियाणा, चंदीगढ आणि हिमाचल प्रदेश :

- १९६६ साली पंजाब राज्याचे विभाजन करुन हरियाणा (१७ वे राज्य) आणि केंद्रशासित प्रदेश - चंदीगढ निर्माण करण्यात आले. यानंतर मास्टर तारा सिंह यांच्या नेतृत्वाखाली अकाली दलाने शिखांसाठी स्वतंत्र राज्याची – पंजाबी सुभा मागणी केली. शाह आयोगाच्या (१९६६) शिफारशीवरुन केवळ पंजाबी भाषिकांचे पंजाबराज्य, हिंदी भाषिकांचे हरियाणा राज्य आणि पर्वतीय प्रदेश शेजारच्या हिमाचल प्रदेश (तत्कालीन केंद्रशासित प्रदेश) मध्ये विलीन करण्यात आला. १९७१ साली हिमाचल प्रदेशला घटकराज्याचा (१८ वे राज्य) दर्जा देण्यात आला.

### ज) मणिपूर, त्रिपुरा आणि मेघालय :

- १९७२ मध्ये उत्तर – पूर्व भारतातील राज्यांमध्ये मोठा बदल करण्यात आला. मणिपूर आणि त्रिपूरा या दोन केंद्रशासित प्रदेशांना आणि उपराज्य असलेल्या मेघालयाला राज्याचा दर्जा देण्यात आला. याशिवाय मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश (मुळत: नॉर्थ इस्ट फ्रंटीयर एजन्सी नेफा या नावाने परिचित) या दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. अशाप्रकारे भारतातील घटकराज्यांची संख्या २१ झाली (मणिपूर १९ वे, त्रिपूरा २० वे, मेघालय २१ वे राज्य.) सुरुवातीला १९६९ साली २२ व्या घटनादुरुस्तीने मेघालयाची निर्मिती 'स्वायत्त राज्य' किंवा 'उप – राज्य' म्हणून आसाम या राज्यांतर्गतच केली होती. याशिवाय मेघालयामध्ये स्वत:चे विधिमंडळ आणि मंत्रिमंडळही कार्यरत होते. तथापि, यामुळे मेघालयातील लोकांच्या आकांक्षांचे समाधान झाले नाही. आसाम राज्याच्या भूप्रदेशातूनच मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश या दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली.

### झ) सिक्कीम :

- १९४७ पर्यंत सिक्कीम हे भारतीय संस्थानिक राज्य होते आणि तेथे चोग्याल (Chogyal) यांचे राज्य होते. १९४७ साली ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर 'सिक्कीम' भारताच्या 'संरक्षणाखालील प्रदेश' (Protectorate) बनला. सिक्कीमच्या संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळणाची जबाबदारी भारत सरकारने स्वीकारली. १९७४ मध्ये सिक्कीमने भारताबरोबर मोठया प्रमाणात संबंध निर्माण करण्याची इच्छा व्यक्त केली. तद्नुषंगाने, १९७४ साली संसदेने ३५ वी घटनादुरुस्ती कायदा संमत केला.

या घटनादुरुस्तीन्वये सिक्कीम हे भारतीय संघाचे 'सोबती/ संगत राज्य' बनले. या हेतूपूर्तीकरिता राज्यघटनेमध्ये नव्याने कलम २ 'अ' आणि १० व्या अनुसूचीचा समावेश करण्यात आला. सिक्कीममधील जनतेच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने हा प्रयोग फार काळ टिकला नाही. १९७५ साली घेतलेल्या सार्वमतामध्ये तेथील जनतेने चोंगळ राजवट संपुष्टात आणण्यावर जोर दिला आणि सिक्कीम भारताचा अंतर्गत प्रदेश बनला. १९७५ साली ३६ वी घटनादुरुस्ती करुन सिक्कीमला भारतातील घटकराज्याचा (२२ वे) दर्जा देण्यात आला. या घटनादुरुस्तीने पहिल्या आणि चौथ्या अनुसूचीमध्ये दुरुस्ती करुन सिक्कीमच्या प्रशासनाबाबत विशेष तरतूद असणाऱ्या कलम ३७१ 'फ' या नव्या कलमाचा समावेश करण्यात आला. याशिवाय या दुरुस्तीने कलम २ 'अ' आणि १० वे परिशिष्ट रद्द करण्यात आले.

### ट) मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि गोवा :

- १९८७ मध्ये तीन नवी राज्ये - मिझोराम (२३ वे), अरुणाचल प्रदेश (२४ वे) आणि गोवा (२५ वे) – भारतीय संघ व्यवस्थेत निर्माण करण्यात आली. १९८६ मध्ये केंद्र सरकार आणि मिझो नॅशनल फ्रंट यांच्यात निवेदनावर स्वाक्षऱ्या झाल्याने मागील दोन दशकांपासून चालू असलेली बंडाळी थांबविण्यात आली. या घटनेचा परिणाम म्हणून केंद्रशासित प्रदेश असलेल्या मिझोरामला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला. १९७२ पासून अरुणाचल प्रदेशही केंद्रशासित होता. गोवा, दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशापासून विभक्त करुन गोवा हे स्वतंत्र राज्य करण्यात आले.
- ठ) छत्तीसगढ, उत्तरांचल आणि झारखंड :
- इ.स. २००० मध्ये मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, आणि बिहार या राज्यांमधून अनुक्रमे छत्तीसगढ, उत्तरांचल आणि झारखंड ही तीन नवी राज्ये निर्माण करण्यात आली. ही घटकराज्ये भारतीय संघव्यवस्थेतील अनुक्रमे २६, २७ आणि २८ वे घटकराज्य बनले.

### ढ) तेलंगणा :-

- इ.स. २०१४ मध्ये आंध्रप्रदेशमधून तेलंगणा या राज्याची निर्मिती.
- ३० जुलै २०१३ रोजी मान्यता. आंध्रप्रदेश पुनर्रचना ॲक्ट २०१४ संसदेत मंजूर. १ मार्च २०१४ रोजी राष्ट्रपतीची स्वाक्षरी.
- १ जून २०१४ रोजी तेलंगणा राज्य २९ वे घटकराज्य बनले. अशाप्रकारे, १९५६ मध्ये १४ घटकराज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेश होते.
- २०१५ सालामध्ये (आजही) त्यांची संख्या २९ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश अशी झाली.
- १०० वी घटनादुरुस्ती २०१५ नुसार बांग्लादेश व भारत यामधील सीमाप्रश्न सोडविण्यात आला.

## नागरिकत्व (भाग २)

| | भाग दुसरा : नागरिकत्व |
|---|---|
| ५ | संविधानाच्या प्रारंभीचे नागरिकत्व |
| ६ | पाकिस्तानातुन स्थलांतर करुन भारतात आलेल्या व्यक्तींचे नागरिकत्वाचे अधिकार |
| ७ | स्थलांतर करुन पाकिस्तानात गेलेल्या व्यक्तीचे नागरिकत्वाचे अधिकार |
| ८ | मूळ भारतीय, पण देशाबाहेर राहणाऱ्या व्यक्तींचे नागरिकत्वाचे स्वेच्छेने संपादणाऱ्या व्यक्ती भारतीय नागरिक नसणे. |
| ९ | परकीय देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने संपादणाऱ्या व्यक्ती भारतीय नागरिक नसणे नागरिकत्वाचे अधिकार चालू राहणे. |
| १० | नागरिकत्वाचे अधिकार चालू राहणे. |
| ११ | नागरिकत्व हक्क नियमनाचे संसदेने अधिकार |

### भाग - २ / (५ - ११) कलमे

**अर्थ** - भारताच्या राज्यसंस्थेचा सदस्य (Member of state)

↓

नागरीक बनल्यामुळे त्याला सर्व **नागरी व राजकीय** अधिकार प्राप्त होतात.

## देशात राहणारे नागरिक

- नागरिक
  - मुलभूत हक्क
    - कलम १५
    - कलम १६
    - कलम १९
    - कलम २९, ३०
    - वरील कलमांमधील हक्क फक्त नागरिकांना आहेत.
  - अधिकार
    1. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था या निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क
    2. संसद आणि राज्यविधानमंडळाचे सदस्यत्व फक्त नागरिकांना प्राप्त होऊ शकेल.
    3. काही महत्वाची सार्वजनिक पदे धारण करण्याचा अधिकार
       - राष्ट्रपती – आपल्याला जन्मतत्वाद्वारे तसेच स्वीकृत तत्वाद्वारे परकीयाला राष्ट्रपती बनता येईल.
       - उपराष्ट्रपती
       - सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश
       - राज्यपाल
       - भारताचे महान्यायवादी
       - राज्याचे महाधिवक्ता
- परकीय
  - मित्र परकीय
    - ज्या देशांशी भारताचे मैत्रीचे संबंध आहे. त्याचा नागरिक
  - शत्रू परकीय
    - आपण ज्या देशाशी काही कालावधीसाठी गुंतलेले आहोत त्यांचा नागरिक
    - कलम – २२ अंतर्गत
    - अटक व स्थानबद्ध या विरुद्ध संरक्षण नाही.

## ➢ घटनात्मक तरतुदी :

२६ जानेवारी, १९५० रोजी कोणती व्यक्ती भारताचे नागरिक असतील याबद्दलच्याच तरतुदी देण्यात आलेल्या आहेत. त्यांमध्ये घटनेच्या प्रारंभानंतर नागरिकत्वाचे संपादन किंवा समाप्ती कशी होईल, याबाबतच्या कोणत्याही स्थायी अशा तरतुदी देण्यात आलेल्या नाहीत.

या अधिकाराचा वापर करुन संसदेने 'नागरिकत्व कायदा, १९५५' संमत केला. त्यामध्ये १९५७, १९६०,१९८५, १९८६, १९९२, २००३, २०१५, २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आल्या.

घटनेचे कलत ५, ६, ७ आणि ८ मध्ये घटनेच्या प्रारंभी (२६ जानेवारी, १९५० रोजी) कोणते व्यक्ती भारताचे नागरिक बनतील याची तरतूद देण्यात आली आहे. अशा व्यक्तींचे चार गट पुढीलप्रमाणे:

## ➢कलम ५: घटनेच्या प्रारंभीचे नागरिकत्व (अधिवासाच्या आधारावर): -

घटनेच्या प्रारंभी, भारताच्या राज्यक्षेत्रात अधिवास असलेली प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक असेल, जर :

१) ती भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली होती, किंवा

२) तिच्या मात्यापित्यापैकी कोणीही एक भारताच्या राज्यक्षेत्रास जन्मले होते, किंवा

३) ती अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी किमान पाच वर्षे इतका काळ भारताच्या राज्यक्षेत्रात सामान्यत: निवासी आहे.

## ➢कलम ६ : पाकिस्तानातून स्थलांतरितांचे नागरिकत्व :-

पाकिस्तानातून भारतात स्थलांतर करुन आलेला व्यक्ती घटनेच्या प्रारंभी भारताचा नागरिक असल्याचे मानले जाईल जर :
१) तिचा किंवा तिच्या मातापित्यांपैकी किंवा तिच्या आजा - आजींपैकी कोणाही एकाचा भारतात जन्म झाला असेल, आणि
२) i) अशा व्यक्तीने १९ जुलै, १९४८ पूर्वी स्थलांतर केले असेल व तेव्हापासून भारतात सामान्यत: निवासी असेल तर किंवा
ii) अशा व्यक्तीने १९ जुलै, १९४८ नंतर स्थलांतर केले असेल व घटनेच्या प्रारंभापूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज करुन नागरिक म्हणून नोंदणी करुन घेतली असल्यास, मात्र असा अर्ज करण्यापूर्वी तो भारतात सलग ६ महिने निवासी असावा.

## ➢कलम ७ : स्थलांतर करुन पाकिस्तानात गेलेल्या व परत भारतात आलेल्या व्यक्तींचे नागरिकत्व :-

१ मार्च, १९४७ पूर्वी पाकिस्तानात स्थलांतर करुन गेलेला व्यक्ती भारताचा नागरिक असणार नाही. मात्र अशी व्यक्ती कायदेशीर परवान्याखाली पुन्हा स्थायिक होण्यासाठी किंवा कायमचे परत येण्यासाठी भारतात परतलेली असेल, तर तिला भारताचे नागरिक मानले जाईल. (असा व्यक्ती १९ जुलै, १९४८ नंतर भारतात स्थलांतर करुन आला असल्याचे मानले जाईल.)

## ➢ कलम ८ : मुळच्या भारतीय असलेल्या, पण भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींचे नागरिकत्व (PIO चे नागरिकत्व) :-

जी व्यक्ती किंवा तिच्या मातापित्यांपैकी किंवा आजा - आजींपैकी कोणीही एक भारतात जन्मले होते आणि जी भारताबाहेरील कोणत्याही देशात सामान्यत: निवास करत आहे, अशी कोणतीही व्यक्ती भारताची नागरिक असल्याचे मानले जाईल जर :
तिने ती राहत असलेल्या देशातील भारताच्या राजदौतिक किंवा वाणिज्यदौतिक प्रतिनिधींकडे घटनेच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर नागरिकत्वासाठी केलेल्या अर्जावरुन जर अशा प्रतिनिधीने तिची भारताची नागरिक म्हणून नोंदणी केली असेल तर अशी नोंदणी जन्मापासून १ वर्षाच्या आत करावी.

**➢कलम ९ :** कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही परकीय देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने संपादिले असेल तर, ती व्यक्ती भारताची नागरिक असणार नाही.

**➢कलम १० :** भारताची नागरिक असलेली प्रत्येक व्यक्ती संसद जो कोणताही कायदा करील त्याच्या तरतुदींच्या अधीन राहून नागरिक म्हणून कायम राहील.

**➢कलम ११ :** संसदेला नागरिकत्वाचे संपादन व समाप्ती आणि नागरिकत्वविषयक अन्य सर्व बाबींसंबंधी कायद्याने तरतूद करण्याचा अधिकार असेल.

## ➢भारतीय नागरिकत्व कायदा १९५५ :-

➢ या कायद्याने राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर नागरिकत्व प्राप्त करणे किंवा रद्द होणे आणि राष्ट्रकुलासाठी नागरिकत्व इ. संदर्भातील तरतूदी केलेल्या आहेत. १९८६, १९९२, २००३, २००५ आणि २०१५ च्या 'नागरिकत्व (घटनादुरुस्ती) कायदा' या अंतर्गत पाचवेळा या मूळ कायद्यात बदल करण्यात आला आहे.

### ❖ नागरिकत्वाची प्राप्ती :-

- संसदेने १९५५ साली नागरिकत्वाशी संबंधित कायदा केला. या कायद्यानुसार पुढील ५ प्रकारे कोणत्याही व्यक्तीला भारताचे नागरिक होता येते.
- **भारतीय नागरिकत्वाचा कायदा १९५५ (दुरुस्त्या १९५७, १९६०,१९८५, १९८६, १९९२, २००३, २०१५, २०१९,) पुढील पाच प्रकारे नागरीकत्व घेता येते.**

**१) जन्मतत्त्वाने २) वंशतत्त्वाने ३) नोंदणीतत्त्वाने ४) प्राकृतिक रित्या ५) भूप्रदेश ऐकिकरण**

**१) जन्मतत्त्वाद्वारे** (By Birth) – १९८६ साली कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार एखादी व्यक्ती जन्माने भारतीय नागरिक होऊ शकते जर: अ) त्या व्यक्तीचा जन्म भारतात २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर आणि ३० जून १९८७ पूर्वी झालेला असेल, किंवा ब) ती व्यक्ती भारतात १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असेल परंतु तिच्या जन्माच्या वेळी तिच्या आईवडिलांपैकी कोणीही एक भारताचे नागरिक असतील तर ३ डिसेंबर २००४ नंतर एक भारतीय पण दुसरा अवैध प्रवासी नको.

- १९८६ साली नमूद केलेल्या दुसऱ्या तरतुदीमुळे श्रीलंका, बांग्लादेश आणि इतर काही आफ्रिकन देशांमधून आलेल्या निर्वासितांना नागरिकत्व मिळविणे अधिक कठीण झाले आहे. भारतामध्ये अवैध स्थलांतर रोखण्यासाठी ही तरतूद करण्यात आली. भारतामध्ये नियुक्त असलेले परकीय राजदूत आणि शत्रुराष्ट्रातील परकीय व्यक्तींच्या मुलांना जन्माने भारतीय नागरिकत्व प्राप्त करता येत नाही.

२) **वंशतत्वाद्वारे** (By Descent) :- संबंधित कायद्यामध्ये १९९२ साली घटनादुरुस्ती करण्यात आली. नव्या तरतूदीनुसार, एखाद्या व्यक्तीचा जन्म २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर भारताबाहेर झालेला असेल मात्र, तिच्या जन्माच्यावेळी तिच्या आई – वडिलांपैकी कोणीही एक भारताचा नागरिक असेल तर वंशत्वाद्वारे त्या व्यक्तीला भारताचे नागरिकत्व मिळू शकते.परंतु, १९९२ पूर्वी भारताबाहेर जन्मलेल्या पण केवळ तिचे वडिल (आई नव्हे) भारतीय असलेल्या व्यक्तींनाच वंशत्वाने नागरिकत्व मिळत असे. (३ डिसेंबर २००४ नंतर जन्म परदेशात झाला तर किंवा एका वर्षात नोंदणी भारतीय वकालतीमध्ये करावी व फक्त भारतीय पासपोर्टचे शपथपत्र)

३) **नोंदणीतत्त्वाद्वारे** (By Registration):- पुढील वर्गवारीतील व्यक्तींनी (जर त्या यापूर्वीच भारतीय नागरिक नसतील तर) नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडून अर्ज केल्यास त्यांची नोंद भारतीय नागरिक म्हणून केली जावू शकते.

- अ) भारतीय वंशाची (मूळतः भारतीय) व्यक्ती, जी नोंदणीकरिता अर्ज करण्यापूर्वी किमान ५ वर्षांपासून भारतात वास्तव्यास होती.
- ब) भारतीय वंशाची व्यक्ती जी भारताबाहेर इतर कोणत्याही देशात वा ठिकाणी वास्तव्यास होती.
- क) भारतीय नागरिकाशी विवाह केलेली व्यक्ती, जी अर्ज करण्यापूर्वी तात्काळ ५ वर्षे भारतात वास्तव्यास होती.
- ड) भारतीय नागरिक असलेल्यांची नाबालिक (अल्पवयीन) मुले आणि
- इ) राष्ट्रकूल संघटनेचे सदस्य असलेल्या राष्ट्रांतील व्यक्ती, नागरिक इ.
- भारताचे नागरिक म्हणून नोंदणी करण्यापूर्वी वरील पाचही वर्गवारीतील व्यक्तींनी राष्ट्रनिष्ठेची शपथ घेणे अत्यावश्यक आहे. १९८६ साली नोंदणीद्वारे नागरिकत्व प्राप्त करण्याची मुदत सहा महिन्यांवरुन पाच वर्षांपर्यंत वाढविण्यात आली.

४) **नागरिकीकरण (प्राकृतिकरित्या)**:-कोणतीही परकीय व्यक्ती नागरिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्व मिळवू शकते, जर –

- अ) ज्या देशांमध्ये भारतीयांना याद्वारे नागरिकत्व मिळत नाही. अशा देशांची ती प्रजा वा नागरिक असू नये.
- ब) तिने इतर देशांच्या नागरिकत्वाचा त्याग केला असेल.
- क) नागरिकीकरणासाठी अर्ज करण्यापूर्वी किमान १२ महिने एकतर तिने भारतामध्ये वास्तव्य केलेले असावे किंवा भारतीय शासकीय सेवेत कार्य केलेले असावे किंवा या १२ महिन्यांपूर्वी ७ वर्षांच्या कालावधीत तिने ४ वर्षे भारतात वास्तव्य केलेले असावे किंवा भारतीय शासकीय सेवेत कार्य केलेले असावे.
- ड) ती व्यक्ती चारित्र्यशील असावी.
- इ) भारतीय राज्यघटनेने मान्यता दिलेल्या भाषांपैकी एखाद्या भाषेचे तिला पुरेसे ज्ञान असावे.
- फ) नागरिकीकरणानंतर भारतामध्ये वास्तव्य करण्याचा किंवा भारताच्या शासनात सेवारत होण्याचा तिचा हेतू असावा.
- तथापि, नागरिकीकरणाच्या सर्व किंवा काही अटी भारत शासन पुढील परिस्थितीत माफ (शिथिल) करु शकते. उदा. एखाद्या व्यक्तीने विज्ञान, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, जागतिक शांतता किंवा मानवी प्रगती या क्षेत्रांमध्ये अतुलनीय, असामान्य असे योगदान दिले असल्यास, अशा प्रत्येक नागरिकाने भारताच्या राज्यघटनेप्रती निष्ठा राखण्याची शपथ घ्यावीच लागते.

५) **भूप्रदेशाच्या एकीकरणाद्वारे** - एखादा कोणताही परकीय भूप्रदेश भारतामध्ये सामील झाला किंवा भारतीय भूप्रदेशाचा भाग बनल्यानंतर भारतीय नागरिक कोण असतील हे भारत सरकार नमूद करते. नमूद (सूचित) केलेल्या तारखेपासून या व्यक्ती भारतीय नागरिक बनतात. उदा. पाँडिचेरीचा भाग भारतीय भूप्रदेश बनल्यानंतर १९५५ च्या कायद्यांर्गत भारत सरकारने १९६२ साली नागरिकत्व (पाँडिचेरी) आदेश जारी केला.

## ➢ नागरिकत्व रद्दबातल होणे :-

- संसदेने १९५५ सालच्या कायद्यामध्ये नागरिकत्व रद्दबातल होण्याचे तीन मार्ग नमूद केलेले आहेत. याशिवाय तत्पूर्वी राज्य घटनेअंतर्गत प्राप्त झालेले नागरिकत्व देखील याच मार्गांनी रद्द होऊ शकते.

**१) परित्याग (स्व-इच्छेने) :** भारतीय आणि त्याचबरोबर इतर देशाची नागरिक असलेली व्यक्ती तिचे भारतीय नागरिकत्वाला त्याग करु शकते. एखाद्या युध्दात भारत गुंतलेला असेल आणि त्या दरम्यान अशी घोषणा करण्यात आली तर तिचे नोंदणीकरण केंद्र सरकारद्वारे राखून ठेवले जावू शकते. जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या भारतीय नागरिकत्वाचा त्याग करते, तेव्हा तिच्या अल्पवयीन मुलांचे नागरिकत्वदेखील रद्द ठरते. तथापि, अशी मुले वयात येण्याच्या वर्षादरम्यान (म्हणजे १८ व्या वर्षी) भारतीय नागरिकत्व पुन्हा प्राप्त करु शकतात.

**२) संपुष्टात आणणे :** जेव्हा एखाद्या भारतीय नागरिक स्वच्छेने (जाणीवपूर्वक होशआवाजात आणि जबरदस्तीशिवाय, अयोग्य प्रभाव किंवा बंधन) दुसऱ्या एखाद्या राष्ट्राचे नागरिकत्व प्राप्त केले असल्यास तिचे भारतीय नागरिकत्व आपोआपच संपुष्टात येते. तथापि, भारत एखाद्या युध्दात गुंतलेला असल्यास, युध्दादरम्यान ही तरतूद गैरलागू ठरते.

**३) सक्तीने रद्दबातल करणे :** पुढील कारणास्तव केंद्र सरकार भारतीय नागरिकत्व रद्द करु शकते.

- अ) फसवणुकीने भारतीय नागरीकत्व प्राप्त केलेले असल्यास
- ब) संबंधित नागरिकाने भारतीय राज्यघटनेप्रती निष्ठाभंग केला असेल.
- क) युध्दादरम्यान संबंधित नागरिकाने शत्रुशी बेकायदेशीररित्या व्यापार किंवा संवाद साधला असल्यास
- ड) नोंदणी किंवा बहालत्व या मार्गाने नागरिकत्व प्राप्त झाल्यानंतर ५ वर्षांच्या कालावधीत त्या व्यक्तीला कोणत्याही राष्ट्रामध्ये २ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल, आणि
- इ) संबंधित नागरिकाने सलगपणे ७ वर्षे भारताबाहेर वास्तव्य केले असेल तर नागरिकत्व रद्दबातल केले जाते.

| मुळ भारतीय व्यक्ती व परदेशी भारतीय व्यक्ती यातील फरक | |
|---|---|
| **मूळ भारतीय व्यक्ती** (Person of Indian Orign) | **परदेशी भारतीय व्यक्ती** (Overseas Citizen of India) |
| गृहमंत्रालयाची योजना १९-०८-२००२ पासून लागू | नागरिकत्वाचा कायदा १९५५ प्रमाणे ०२-१२-२००५ पासून लागू |
| **पात्रता :**<br>१) ज्या व्यक्तीकडे भारतीय पासपोर्ट आहे.<br>२) एखाद्या व्यक्तीचे आई किंवा वडील १९३५ चा कायदा लागू होण्यापूर्वी भारताचे स्थायी नागरिक असतील अथवा त्यानंतर समाविष्ट झालेल्या प्रदेशाचे रहिवासी असतील तर. | **पात्रता :**<br>१) २६-०१-१९५० रोजी ज्या व्यक्तीकडे भारतीय नागरिक होण्याची पात्रता आहे.<br>२) २६-०१-१९५० ला भारताचा नागरिक अथवा त्यानंतर भारताचे नागरिकत्व<br>३) १५-०८-१९४७ नंतर भारतात समाविष्ट झालेल्या भागाचा रहिवासी तो किंवा त्याचे मूल अथवा नातवंडे |
| **अपात्रता :**<br>१) अफगाणिस्तान, बांग्लादेश, भुटान, चीन, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका या देशांचे नागरीक<br>२) भारतीय नागरिक व भारतात जन्मलेले मुले | **अपात्रता :**<br>१) बांग्लादेश, पाकिस्तानचे नागरिक |
| **कार्ड प्राप्त करण्यासाठी शुल्क :**<br>२) वरिष्ठ नागरिक १५००० रु.<br>३) लहान मुले ७५०० रु. | २७५ अमेरीकन डॉलर इतकी भारतीय रक्कम |
| **मिळणाऱ्या सुविधा :**<br>१) भारतात येण्यासाठी विसाची आवश्यकता नाही. कार्ड मिळाल्यापासून १५ वर्षे भारतात येऊ शकता.<br>२) पहिल्या वेळी १८० दिवस राहू शकता. याकरता कोणत्याही नोंदणीची गरज नाही. पण हा कालावधी संपल्यास ३० दिवसाच्या आत FRR किंवा FRO मध्ये नोंद करावी.<br>३) कृषि व बागा यांची स्थापना सोडून सर्व आर्थिक वित्तीय आणि शैक्षणिक सुविधा मिळतील. राजनैतिक अधिकारामध्ये कोणतीही समानता नसेल.<br>४) पर्वतारोहण, मिशनरी, शोधकार्य, प्रतिबंधक क्षेत्रात प्रवास सोडून इतर काम करु शकतो. त्याकरीता सरकारची विशेष परवानगी घ्यावी. | १) भारतामध्ये येण्याकरिता वेगवेगळ्या कारणासाठी विसा मिळेल. असा विसा आयुष्यभरासाठी मिळेल.<br>२) स्थानिक पोलीसाकडे नोंदणी करणे गरजेचे नाही.<br>३) कृषि व बागा यांची स्थापना सोडून सर्व आर्थिक वित्तीय आणि शैक्षणिक सुविधा मिळतील. राजनैतिक अधिकारामध्ये कोणतीही समानता नसेल.<br>४) पर्वतारोहण, मिशनरी, शोधकार्य, प्रतिबंधक क्षेत्रात प्रवास सोडून इतर काम करु शकतो. त्याकरीता सरकारची विशेष परवानगी घेण्याची गरज नाही. |
| **भारतीय नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी :**<br>१) वरील कार्डधारक सलग ७ वर्षे भारतात राहत असेल तर | १) अर्ज देण्याच्या अगोदर १ वर्षे व अर्ज दिल्यावर ५ वर्षात नागरीकत्व मिळेल. |

❖**महत्त्वाचे** : २०११ मध्ये भारत सरकारने भारतीय नागरिकत्व कायदा १९५५ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी Person of Indian Orign व Overseas Citizen of India यांना एकत्र करुन एक नवीन कार्ड योजना म्हणजेच Overseas Indian Card Holder Scheme नावाचे विधेयक संसदेत आणले होते ते २०१६ मध्ये मंजूर झाले.

- पुढील मुलभूत हक्क हे केवळ भारतीय नागरिकांनाच उपलब्ध असून कोणत्याही परकीय व्यक्तीला उपलब्ध नाहीत.
  1) कलम १५ – धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थळ या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध
  2) कलम १६ – सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी
  3) कलम १९ (१) – स्वातंत्र्याशी संबंधित ६ हक्कांना संरक्षण
  4) कलम २९ - अल्पसंख्याकांच्या भाषा, लिपी आणि संस्कृतीचे संरक्षण
- कलम ३० – शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन चालविण्याचा अल्पसंख्यांकाचा हक्क

## ❖ नागरिकत्वाचा कायदा :

या अधिनियमाद्वारे पाकिस्तान, बांग्लादेश व अफगाणिस्तान मधील १. जैन २. ख्रिश्चन ३. शीख ४. बौद्ध ५. पारसी व ६. हिंदू धर्मातील व्यक्तींना जर ते ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आले असतील तर याच कायद्यातील प्राकृतिक तत्वातील “मानवतेच्या आधारावर नागरिकत्व” देण्यात येईल अशी तरतूद केली.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★